ePaper


**दुग्ध व्यवसायाला ‘अच्छे दिन’ येणार, डेअरीचे प्रश्न सुटणार, अतुल सावेंचं आश्वासन**



| वर्ष - 8 | अंक - 225 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 2 मार्च 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## आतील पानांत


- इंग्लंडचही नशीब पाकिस्तानसारखंच!
- नायरने शानदार शतक झळकावले
- एलॉन मस्क आता १४ मुलांचे बाप
- देशात मराठी-हिंदी-इंग्रजीला पसंती


### ‘पीएमआरडीए’कडून 10 ठिकाणी पर्यायी रस्त्यांचा प्रस्ताव

# पिंपरी चिंचवडची वाहतूक कोंडी फुटणार!

**857.59 कोटी रुपये खर्च अपेक्षित**
**खेड, शिरूर, मावळ, मुळशी तालुक्यातील पर्यायी रस्ते**

| मुंबई-पुणे | प्रतिनिधी | महाईन्यूज

**खेड, शिरूर, मावळ, मुळशी तालुक्यातील पर्यायी रस्ते (मिसिंग लिंक) जोडून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) पुणे आणि पिंपरी चिंचवड शहराची वाहतूक कोंडी फोडणार आहे. पीएमआरडीए आपल्या हद्दीत दहा ठिकाणी पर्यायी रस्ते (मिसिंग लिंक) तयार करणार असून यासाठी ८५७.५९ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. पुणे जिल्हाधिकाऱ्यांकडून या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर रस्त्यांच्या भूसंपादनाचा प्रश्न मार्गी लागणार आहे.**



पुणे आणि पिंपरी चिंचवड शहर चहूबाजूंनी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या दोन्ही शहरांमध्ये वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस जटील होत आहे. पिंपरी चिंचवड शहरातील औद्योगिक नगरी आयटी क्षेत्रात वाहतुकीच्या समस्येमुळे मोठे परिणाम होत असल्याच्या तक्रारी उद्योजक तसेच नोकरदार वर्गाकडून करण्यात आल्या. त्यामुळे या दोन्ही शहरांबरोबरच आजूबाजूच्या तालुक्यातील पर्यायी रस्ते विकसित करण्याचा निर्णय पीएमआरडीए ने घेतला आहे.

यासाठी ‘पीएमआरडीए’कडून 10 ठिकाणी पर्यायी रस्ते करण्याचे नियोजन आहे. दहा ठिकाणी भूसंपादन करून रस्त्यांच्या कामाला सुरूवात होणार आहे. चार तालुक्यांमधून हे रस्ते जोडण्यात येणार आहेत. यामध्ये खेड, शिरूर, मावळ, मुळशी आदी तालुक्यांचा समावेश आहे. खेड तालुक्यात चार, शिरूर, मावळ आणि मुळशीमध्ये प्रत्येकी दोन ‘पर्यायी रस्ते तयार होणार आहेत. यासाठी ८५७.५९ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या मंजुरीनंतर कार्यवाही वेगाने होण्याची अपेक्षा आहे.



दहा पर्यायी रस्त्यांमध्ये खेड तालुक्यातील ३० मीटर रुंदीचा तळेगाव-चाकण महामार्ग. हिंगणे चौक ते चाकण औद्योगिक वसाहत टप्पा ३ येथे वोल्कस्वॅगण कंपनी खराबवाडीला जोडणारा रस्ता.मौजे नाणेकरवाडी येथील सॅनी कंपनी ते राज्यमार्ग ६० येथील समृद्धी सीएनजी पंपाला जोडणारा रस्ता. मौजे मेदानकरवाडी, येथील राष्ट्रीय महामार्ग ६० येथील बंगला वस्ती चौक ते राष्ट्रीय महामार्ग ५५ रासे फाटा पर्यंतचा रस्ता. याशिवाय पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग ६० चाकण एमआयडीसी टप्पा-५ तसेच तळेगाव एमआयडीसी ते जुना मुंबई-पुणे महामार्गाला जोडणारा प्रमुख मार्ग. मुळशी तालुक्यातील बालेवाडी स्टेडियमजवळून म्हाळुंगे गावातून जाणारा रस्ता. ३० मीटर रुंदीचा सूर्या हॉस्पिटल ,बालेवाडी स्टेडियमजवळून म्हाळुंगे गावातून जाणारा रस्ता. ३० मीटर रुंदीचा सूर्या हॉस्पिटल (पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८) ते साखरे वस्ती हिंजवडी फेज-१ पर्यंतच्या रस्त्याचा समावेश आहे.

### पिंपरी चिंचवड, हिंजवडीसह लोणावळ्यातील वाहतूक कोंडी कमी होणार

पीएमआरडी कडून करण्यात येणाऱ्या पर्यायी दहा रस्त्यांमुळे बालेवाडी, सुस-बाणेर, चांदणी चौक, हिंजवडी फेज-एक, दोन आणि तीन मध्ये होणारी वाहतूक कोंडी कमी होईल असा दावा करण्यात आला आहे. या भागातील वाहतूक कोंडीचे ताण कमी झाल्यास वाकड येथील छत्रपती चौक, हिंजवडीतील काही भागांत होणारी वाहतूक कोंडी टळणार आहे. तर, देहू येलवाडी ‘पर्यायी रस्त्यामुळे चाकण-शिक्रापूर रस्त्यावरून थेट पिंपरी-चिंचवडला जोडण्याचा मार्ग उपलब्ध होईल. तसेच जुना पुणे-मुंबई मार्ग जोडला जाणार असल्याने पिंपरी-चिंचवडमधील वाहतूक कोंडीला आळा बसेल. स्काय वॉक प्रकल्पास पर्यायी रस्ता उपलब्ध असल्याने लोणावळा शहरातील वाहतूक कोंडी थांबणार आहे.

“ पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरासह लगतच्या तालुक्यांमधील वाहतूक कोंडीचा ताण कमी करणे हे पीएमआरडीएचे मुख्य उद्दिष्ट आहे .यासाठी पर्यायी रस्त्यांचा तातडीने विकास होणे गरजेचे आहे. या पर्यायी रस्त्यांमुळे शहरातून जाणारी वाहने बाहेरून वळवली जातील. पर्यायी रस्त्यामुळे मार्गामुळे हिंजवडी, लोणावळ्यासह इतर औद्योगिक परिसर, पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील वाहतून कोंडीला आळा बसेल.

**-योगेश म्हसे,** आयुक्त, पीएमआरडीए.

# चार तलावांसाठी दोन कोटींचा खर्च!

## शहरातील चार तलावांच्या सुशोभीकरणाचे काम केले जाणार

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे शहरातील कात्रज, पाषाण, पेशवे तसेच मॉडेल कॉलनी येथील तलावांचे सुशोभीकरण केले जाणार असून यासाठी दोन कोटी रुपयांचा निधी खर्च केला जाणार आहे. केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत ही कामे केली जाणार आहेत. यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून, महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत या निविदांना मान्यता देण्यात आली.**



महापालिकेच्या वतीने दर वर्षी शहरातील जलपर्णी काढण्यासाठी खर्च केला जातो. तसेच, तलावांच्या स्वच्छतेसाठीदेखील खर्च होतो. केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत मोहिमेंतर्गत महापालिकेला दोन कोटी रुपयांचा निधी तलावांच्या सुशोभीकरणासाठी महापालिकेला मिळाला होता. त्यामधून शहरातील चार तलावांच्या सुशोभीकरणाचे काम केले जाणार आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाने याच्या निविदा काढल्या होत्या.पाषाण तलावासाठी ४१ लाख ८८ हजार रुपये, कात्रज तलावासाठी ४१ लाख ८८ हजार रुपये आणि मॉडेल कॉलनी तलावासाठी ४९ लाख ४२ हजार लाख रुपये खर्च केले जाणार आहेत. तसेच, पेशवे तलावासाठी ४९ लाख रुपयांच्या निविदा काढण्यात आल्या होत्या. त्याला मान्यता देण्याचे प्रस्ताव महापालिकेच्या स्थायी समितीसमोर सादर करण्यात आले होते. त्याला स्थायी समितीच्या बैठकीत या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.या प्रकल्पात तलावाच्या परिसरात झाडे लावणे, कॉंक्रीटचे रस्ते तयार करणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि तलावाभोवती जॉगिंग ट्रॅक बांधणे असे प्रस्तावित आहे. तलावांजवळ कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.

ड्रेनेजमुळे पाणी दूषित होत असल्याने, तलाव स्वच्छ करण्याचे काम महापालिकेने हाती घेतले आहे. २०१७ मध्ये, महापालिकेने कात्रज तलावात येणाऱ्या प्रक्रिया न केलेल्या पाण्यासाठी ड्रेनेज यंत्रणा तयार केली. शिवाय, महापालिकेकडून सध्या दररोज दोन दशलक्ष लिटर क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बांधला जात आहे. पुणे शहर राहण्यासाठी सुंदर आणि प्रदूषणमुक्त करण्याचा प्रयत्न केला जात आहे. हवेची गुणवत्ता ढासळत असताना या प्रकल्पांमुळे पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होणार आहे, असे या प्रस्तावांमध्ये म्हटले आहे.केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत मोहिमेंतर्गत महापालिकेला दोन कोटी रुपयांचा निधी तलावांच्या सुशोभीकरणासाठी महापालिकेला मिळाला होता. त्यामधून शहरातील चार तलावांच्या सुशोभीकरणाचे काम केले जाणार आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाने याच्या निविदा काढल्या होत्या.पाषाण तलावासाठी ४१ लाख ८८ हजार रुपये, कात्रज तलावासाठी ४१ लाख ८८ हजार रुपये आणि मॉडेल कॉलनी तलावासाठी ४९ लाख ४२ हजार लाख रुपये खर्च केले जाणार आहेत. तसेच, पेशवे तलावासाठी ४९ लाख रुपयांच्या निविदा काढण्यात आल्या होत्याकॉंक्रीटचे रस्ते तयार करणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि तलावाभोवती जॉगिंग ट्रॅक बांधणे असे प्रस्तावित आहे.

### पाण्यासाठी ड्रेनेज यंत्रणा तयार

२०१७ मध्ये, महापालिकेने कात्रज तलावात येणाऱ्या प्रक्रिया न केलेल्या पाण्यासाठी ड्रेनेज यंत्रणा तयार केली. शिवाय, महापालिकेकडून सध्या दररोज दोन दशलक्ष लिटर क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बांधला जात आहे. पुणे शहर राहण्यासाठी सुंदर आणि प्रदूषणमुक्त करण्याचा प्रयत्न केला जात आहे. हवेची गुणवत्ता ढासळत असताना या प्रकल्पांमुळे पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होणार आहे, केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत मोहिमेंतर्गत महापालिकेला दोन कोटी रुपयांचा निधी तलावांच्या सुशोभीकरणासाठी महापालिकेला मिळाला होता.

# महापालिकेच्या मिळकती जाणार नगरपरिषदेकडे!

## उरुळी देवाची, फुरसुंगीतील सरकारी मिळकती देण्याचा प्रस्ताव मंजूर

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्य सरकारच्या आदेशानंतर स्वतंत्र नगर परिषद झालेल्या उरुळी देवाची आणि फुरसुंगी या गावांतील महापालिकेच्या मालकीच्या मिळकती सोडून इतर सर्व शासकीय मिळकती नगर परिषदेला परत केल्या जाणार आहेत. महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत हा प्रस्ताव मान्य करण्यात आला.**



पुणे शहराच्या हद्दीलगत असलेल्या उरुळी देवाची आणि फुरसुंगी या दोन गावांचा समावेश महापालिकेच्या हद्दीत २०१७ मध्ये करण्यात आला होता. ही गावे महापालिकेत आल्यानंतर तेथे आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यास महापालिकेने सुरुवात केली होती. या गावांमध्ये पूर्वी जिल्हा परिषद असल्याने गावांचा समावेश महापालिकेत झाल्यानंतर तेथील मालमत्ता महापालिकेच्या ताब्यात आल्या होत्या.राज्य शासनाने विधानसभा निवडणुकीपूर्वी ११ सप्टेंबर २०२४ रोजी आदेश काढत या गावांसाठी स्वतंत्र नगर परिषदेची स्थापना केली आहे. या नगर परिषदेचे काम तातडीने होणे शक्य नसल्याने विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमत या गावांच्या विकासाचा रोडमॅप तयार करण्यात आला असून, पुढील सहा महिन्यांत टप्प्याटप्प्याने या सोयीसुविधा हस्तांतरित करण्याचा आदेश देण्यात आला आहे.त्यानुसार या नगर परिषदेच्या प्रशासकाकडून महापालिकेकडे ही गावे २०१७ मध्ये समाविष्ट झाली. त्या वेळच्या ग्रामपंचायतीच्या मालकी हक्काच्या इमारती, बखळ, बाजार, गाळे, तसेच इतर मिळकतींची माहिती मागविली होती. या दोन्ही गावांमधून नागरी सुविधा क्षेत्र ताब्यात देण्याचीदेखील मागणी महापालिकेकडे करण्यात आलेली होती. त्यानुसार, या दोन्ही गावांमध्ये ग्रामपंचायतीच्या ११६ मिळकती आणि आरक्षणापोटी ताब्यात आलेल्या १३ जागांची माहिती संकलित करण्यात आली. काही सेवा क्षेत्राच्या जागांवर महापालिकेने सुविधा केंद्रे सुरू केली आहेत. त्यानुसार, महापालिकेकडून या गावातील शासकीय मिळकती टप्प्याटप्प्याने नगर परिषदेकडे हस्तांतरित केल्या जाणार आहेत. स्थायी समितीच्या बैठकीत याला मान्यता देण्यात आली. पहिल्या टप्प्यात दोन्ही ग्रामपंचायती महापालिकेत आल्या त्या वेळी ताब्यात घेतलेल्या मिळकती हस्तांतरित करणे, दुसऱ्या टप्प्यात सेवा क्षेत्र व रस्त्यांसाठी ताब्यात आलेल्या जागा, तर तिसऱ्या टप्प्यात ज्या मिळकतींमध्ये महापालिकेची नागरी सेवा केंद्रे आहेत.

### 13 जागांची माहिती संकलित

.पुणे शहराच्या हद्दीलगत असलेल्या उरुळी देवाची आणि फुरसुंगी या दोन गावांचा समावेश महापालिकेच्या हद्दीत २०१७ मध्ये करण्यात आला होता. ही गावे महापालिकेत आल्यानंतर तेथे आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यास महापालिकेने सुरुवात केली होती. या गावांमध्ये पूर्वी जिल्हा परिषद असल्याने गावांचा समावेश महापालिकेत झाल्यानंतर तेथील मालमत्ता महापालिकेच्या ताब्यात आल्या होत्या.

## पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील

# साडेसहा लाख मुलांचे ‘जेई’ लसीकरण!

### शहरात लसीकरण सुरू; आठ रुग्णालय, झोन कार्यालय स्तरावर अंमलबजावणी

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील एक ते पंधरा वर्षे वयोगटातील सहा लाख 58 हजार 607 मुलांचे लसीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खराटे यांनी सांगितले.**




राज्य शासनाच्या आदेशानुसार पिंपरी चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील जेई लसीकरण मोहीम 1 मार्च 2025 पासून सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत एकूण सहा लाख 58 हजार 607 इतक्या मुला मुलींचे लसीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आठ रुग्णालय, झोन कार्यालय स्तरावर अंमलबजावणी व अहवाल सादरीकरण कक्ष तयार करण्यात आले. यासाठी सर्व ८ रुग्णालय झोन स्तरावरील जेष्ठ वैद्यकीय अधिकारी हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील समन्वयक अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत.

### 4 हजार 391 लसीकरण सत्रांचे नियोजन

सर्व रुग्णालय, झोन कार्यालय यांच्या मार्फत 4 हजार 391 लसीकरण सत्रांचे नियोजन केलेले आहे. जेई लसीकरण सत्रे ही पिंपरी चिंचवड शहरातील सर्व मनपा आणि खासगी प्राथमिक, माध्यमिक शाळा, बालवाडी, नर्सरी तसेच समुदाय केंद्रे (अंगणवाडी) इत्यादी ठिकाणी आयोजित केली जाणार आहे.

या लसीकरण मोहिमेकरिता एकूण १८२ लस टोचक काम करणार असून, त्यांना ६०६ आशा कार्यकर्त्या, ३१६ अंगणवाडी सेविका आणि १२०० शिक्षक मदत करणार आहेत.

---

## प्लॉगेथॉन स्वच्छता मोहिमेत 3 टन कचरा संकलन

### महापालिका आरोग्य विभागासमवेत नागरिकांचाही उत्स्फूर्त सहभाग

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिका आरोग्य विभाग, तसेच नागरिकांच्या माध्यमातून प्लॉगेथॉन स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेमध्ये महापालिका आरोग्य विभागासमवेत नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्वच्छता मोहिमेमध्ये तीन टन कचरा संकलन करण्यात आले.**



आरोग्य विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवण्यात आली. नाशिक फाटा ते लांडेवाडी चौक या अडीच किलोमीटर परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.ह प्रभागाचे मुख्य आरोग्य निरीक्षक उद्धव डवरी उपस्थित होते. यावेळी आरोग्य विभाग व बेसिक्स टीमने विशेष जनजागृती केली .या अभियानात नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला.त्यामध्ये पुणे प्लॉगर्स, मानवी हक्क संरक्षण जागृती आणि इतर सामाजिक संस्थांनी सहभागी होऊन 3 टन कचऱ्याचे संकलन केले.यामध्ये प्लास्टिक बाटल्या, घनकचरा मोठ्या प्रमाणात होता .


ह प्रभागाचे क्षेत्रिय आधिकारी महेश वाघमोडे ,सहाय्यक आरोग्य अधिकारी अंकुश झिंटे, मानवी हक्क संरक्षण आणि जागृतीचे शहराध्यक्ष अण्णा जोगदंड, आरोग्य सहाय्यक मोहन वाघमारे पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा संगिता जोगदंड,आरोग्य निरीक्षक स्नेहल सोनवणे ,संदिप राठोड,सचिन जाधव,दिपक कोटियाना,नितीन तुपे हे आरोग्य निरीक्षक विकास शिरोळे,गौरव गायकवाड,.आदिती निकम, सुरेश डोळस उपस्थित होते.

**प्लॉगेथॉन मोहिमेची वैशिष्ट्ये:**
या मोहिमेत सफाई कर्मचारी, स्थानिक नागरिक, आरोग्य मुकादम आणि झोन इंचार्ज सहभागी होतात. या मोहिमेत रस्ते, फुटपाथ, गार्डनची सखोल स्वच्छता केली जाते. नद्या आणि त्यांच्या आसपासच्या घाट परिसरांची स्वच्छता केली जाते. महात्मा जोतीराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शहरात प्लॉगेथॉन मोहिम राबविण्यात आली आहे.

### प्लॉगेथॉन मोहिमेचे उद्दिष्ट:

नदी हा आपला सांस्कृतिक वारसा असल्यामुळे त्याच्या आसपास असणारा घाट परिसर स्वच्छ असणे तितकेच महत्त्वाचे आहे. नदीच्या पावित्र्याबरोबरच तिथला सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा आपण जपणे आवश्यक असते.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### प्रापंचिक माणसाची स्थिती कशी असतें?

सर्व संतांनी भवरोगावर खात्रीचे औषध सांगितले आहे. सर्व संत आपापल्या परीने मोठेच आहेत. पण त्यांतल्या त्यांत समर्थांनी आपली जागा न सोडता, विषयी लोकांचे चित्त कुठे गुंतलेले असते हे पाहिले आणि मगच रोगाचे निदान केले. आमचा मुख्य रोग, संसार दुःखाचा असून तो सुखाचा आहे असे वाटते हा आहे. रोग कळून आला पण औषध जर घेतले नाही तर तो बरा कसा होणार ? रोग असेल तसे औषध द्यावे लागते. अजीर्णाने पोट दुखते ते भुकेने दुखते असे वाटून आम्ही अधिक खाऊ लागलो तर कसे चालेल ? संसार ज्याला दुःखाचा वाटतो त्यालाच परमार्थमार्गाचा उपयोग ! एखादा दारू पिणारा मनुष्य दारूपायी आपले सर्वस्व घालवतो. दारूचा अंमल नसतो त्या वेळी तो शुद्धीवर येतो. आणि त्याला आपल्या बायको-मुलांची काळजी वाटते. आपला प्रपंच नीट व्हावा असेही त्याला वाटते. पण त्याच्या बुद्धीला त्यातून मार्ग सुचत नाही. मग तो पुनः इतकी दारू पितो की त्यात त्याला स्वतःचा विसर पडतो; आणि अशा रीतीने त्यामध्येच तो स्वतःचा नाश करून घेतो. अगदी याचप्रमाणे प्रापंचिक माणसाची स्थिती होते. पहिल्यापहिल्याने प्रपंच बरा वाटतो, मनुष्य त्यात रमतो. पुढे काही दिवसांनंतर तो थकतो, त्याची उमेद कमी होते आणि म्हणून आता आपल्या हातून परमार्थ कसा होणार असे त्याला वाटते. पण नंतर तो पुनः जोराने प्रपंच करू लागतो, आणि शेवटी हीन अवस्थेत मरून जातो.

जो जगाचा घात करतो तो एका दृष्टीने बरा, कारण जग स्वतःला सांभाळून घेईल; पण जो स्वतःचा घात करून घेतो त्याला कोण सांभाळणार ? तो फार वाईट समजावा. केवळ प्रापंचिक हा असा आत्मघातकी असतो. खोटे कळूनही त्यात सुख मानून तो राहतो, आणि देवाने जे निर्माण केले ते माझ्या सुखाकरिताच केले असे समजून मरेपर्यंत त्यातच गुरफटून जातो. मनुष्य तेच तेच करीत असूनसुद्धा त्याला त्याचा कंटाळा कसा येत नाही ? कालच्या गोष्टीच आपण आज करतो. आपल्या लक्षात जरी आले नाही तरी त्या गोष्टी झालेल्याच असतात. तेच ते जेवण, ती नोकरी, तोच तो पैसा मिळविणे, सगळे तेच ! असे असताना माणसाला कंटाळा का येऊ नये ? याचे कारण असे आहे की, विषय अत्यंत गोड तरी असला पाहिजे, किंवा हावेला तृप्ती तरी नसली पाहिजे. या दोन कारणांपैकी दुसरे कारणच खरे आहे; आपली हाव पुरी झाली नाही हेच खरे आहे. विषयामध्ये सुख आहे ही आपण कल्पना केली. त्याचा अनुभव अनेक वेळा घेतला. तरी अजून आपली कल्पना ही खरी की खोटी हे आपल्याला कळत नाही, हे मात्र और आहे.

**बोधवचन:- जो मनुष्य प्रपंचातला आपला अनुभव जमेस धरत नाही, तो कशानेच शहाणा होत नाही.**

# कर्तव्यदक्ष देवाभाऊ सुसाट, आता थेट 'ॲक्शन मोड' वर !



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामकाजावर लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांची छाप पडली असून मोदी यांच्या प्रमाणेच कठोर निर्णय घेऊन त्यांनी सहकाऱ्यांच्याही नाड्या आवळल्या आहेत. दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी घेतलेल्या काही निर्णयांना फडणवीस यांनी स्थगिती दिली असून काही निर्णय रद्द केले आहेत. विशेषतः पीए किंवा ओएसडी नेमण्याला त्यांनी पूर्णतः चाप लावला आहे. स्वतःच्या अधिकारातच त्या नेमणुका होतील, ही त्यांची भूमिका वरिष्ठ मंत्र्यांसाठी पोटात धस्स करणारी आहे, प्रसंगी गोळा आणणारी आहे !**



### कठोर मुख्यमंत्री, नाराज उपमुख्यमंत्री

फिक्सर आणि भ्रष्ट पीए तसेच ओएसडी नेमणार नाही, म्हणून फडणवीस यांनी भाजप, शिंदे शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी या तिन्ही पक्षांतील मंत्र्यांना नाराज केले आहे, हे स्पष्ट जाणवत आहे. आपली पकड मजबूत करायची तर त्यांना हा धाक ठेवावाच लागणार होता. मात्र, त्यातून एकनाथ शिंदे खूपच आणि अजितदादा थोडेफार नाराज झाले, ही सर्वांच्याच लक्षात आले आहे.

### मंत्र्यांना खासगी सचिवांची प्रतीक्षा

अनेक मंत्री खासगी सचिवांच्या प्रतीक्षेत आहेत. प्रत्येकाचा आपला एक आवडता 'एकलव्य' आहे. तो त्याच्या गुरुला फॉलो करतो. तो सोबत असल्याशिवाय बहुतांश मंडळींना अन्न गोड लागत नाही. काँग्रेस काळात हेच त्यांच्यावर टीका करायचे तर आताच्या आणि गतकाळच्या मंत्र्यांनी जे गुण उधळले आहेत, ते दुर्लक्ष करण्यासारखे नाहीतच. पण, दोन मंत्र्याच्या आणि अनेक अधिकाऱ्यांच्या कारभाराकडे मुख्यमंत्र्यांनी कानाडोळा केला आहे. एखादा जिल्हाधिकारी मंत्र्याचा वसुली क्लार्क बनतो आणि 'कलेक्टर' या आपल्या पदाच्या सात कुळ्यांचा उद्धार करतो, हे गेल्या मंत्रिमंडळात दिसून आले.

### मोठी पदे, मोठी जुळणी..

अर्थात् त्यापेक्षाही मोठ्या पदावरील मंडळी पूर्वीपासून मोठ्या जुळणीत होती. पण, त्यांनी किमान आपल्या पदाचा आब राखला होता. आताचे सुभेदार ज्या पध्दतीने कारभार करत आहेत. त्यामुळे मंत्र्यांनी मागणी करूनही त्यांना फडणवीस यांनी जबाबदारी दिली नाही. राज्यातील राधाकृष्ण विखे पाटील, हसन मुश्रीफ, चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन, गणेश नाईक, गुलाबराव पाटील, संजय राठोड, धनंजय मुंडे, उदय सामंत, शंभूराज देसाई, आशिष शेलार, दत्तात्रय भरणे, जयकुमार गोरे, संजय शिरसाट, भरत गोगावले, मकरंद पाटील आणि प्रकाश आबिटकर या कॅबिनेट मंत्र्यांना तसेच आशिष जयस्वाल, योगेश कदम या राज्यमंत्र्यांना ओएसडी आणि खासगी सचिव दिलेले नाहीत, हे म्हणूनच लक्षात येते.

### फडणवीस यांची 'डोकॅलिटी'..

दरम्यान, मंत्रालयाचा कानोसा घेतला तर फडणवीस यांची यादी तयार असून आठ दिवसात मंत्र्यांना त्यांच्या मर्जीबाहेरचे लोक दिले जातील. कारण, तोंडावर अधिवेशन आहे. त्यामुळे मंत्र्यांना फार गडबड न करता दिले, ते अधिकारी स्वीकारावे लागतील. काही मंत्र्यांचा विशिष्ट अधिकाऱ्यांवर चांगलाच राग आहे. ही मंडळी वर्षानुवर्षे हलत नाहीत, मात्र कान भरायला पुढे असतात, हा त्यांचा कळीचा मुद्दा!

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी शिंदे सेनेच्या काही मंत्र्यांचे नाव काढले. समाजवादी पक्षाच्या आमदारांनी भ्रष्ट अधिकाऱ्यांबाबत तक्रार केली. मात्र, त्याचा परिणाम सरकारवर कितपत होतो हे माहिती नाही. शिंदे शिवसेना त्याची परतफेड केल्यावाचून राहील असे नाही. हे सुद्धा महत्त्वाचे!

### नीलमताईंचा हल्लाबोल

शिंदे शिवसेनेच्या नेत्या आणि विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी ठाकरे सेनेत एक पदासाठी दोन मर्सिडिज द्याव्या लागतात, असा हल्लाबोल केला. त्याचा समाचार ठाकरे सेना घेणारच. पण, इतके देऊनही ठाकरेंवर उलटलेल्या ताईंच्यावर एकनाथ शिंदे यांनी विश्वास ठेवू नये, म्हणून काही मंडळींनी धोक्याचा इशारा दिला आहे. तसे पाहिले तर, अशी अंतर्गत बाब सगळ्याच पक्षात असते. चंद्रकांतदादा पाटील यांच्यासह भाजपची अनेक मंडळी खुद्द देवेंद्र फडणवीस यांच्यावर नाराज आहेत. तरीही शिस्त पाळून ते देवेंद्र फडणवीस हेच आपले नेते आणि पक्ष रोज लोकप्रिय होत आहे, एवढेच ते पाहतात.

### अस्तित्व दाखवण्याचा प्रकार

एकाबाजूला एकनाथ शिंदे यांनी आपल्याला 'हलक्यात घेऊ नये' असा इशारा देऊन ठेवला आहे. कुंभमेळ्याबद्दल फडणवीस यांनी घेण्यापूर्वी शिंदे यांनी आढावा घेतला आणि पालकमंत्रीपदाच्या वादामुळे शिंदे आणि अजित पवार दोघांनी नाशिक कुंभ मेळ्याच्या तयारीच्या बैठकीला दांडी मारली. आपले अस्तित्व दाखवण्याचा हा केवळ एकमेव प्रकार नाही, तर इतरही कुरघोड्या सुरू आहेत.

### मुंडे, कोकाटे आणि मारणेप्रकरण

पुण्यात भाजपाच्या कार्यकर्त्यांना झालेली मारहाण मारणे टोळीला 'मोका' लावून तातडीने झाकण्याचा प्रयत्न झाला. पण, असे अनेक हल्ले राज्यभर सुरू आहेत. मस्साजोगचे सरपंच देखील भाजपाचे बुथ प्रमुख होते. त्यांच्या हत्येच्या प्रकरणात धनंजय मुंडे यांचा राजीनामा फडणवीस घेऊ शकले नाहीत. पाठोपाठ कोकाटेप्रकरण देखील चव्हाट्यावर आले. पीए आणि ओएसडी देण्यात जो ठामपणा फडणवीस यांनी दाखवला, तो ठामपणा फडणवीस या मंत्र्यांचा राजीनामा घेताना दाखवू शकले नाहीत. हा मुद्दा त्यांच्या ठामपणाच्या आणि दमदार नेतृत्वाच्या प्रतिमेला घातक ठरणारा आहे, अर्थात् त्यात सुधारणा देखील होईलच. स्वारगेट स्थानकावर झालेला बलात्कार आणि त्याप्रकरणी राज्यमंत्री योगेश कदम यांची प्रतिक्रिया लोकांचा संताप वाढवणारी आहे.

### अजितदादांचेच नेते कसे?

सध्या महाराष्ट्रात जी काही भ्रष्ट प्रकरणे घडत आहेत, ती अजितदादांच्या पक्षातील मंत्र्यांकडूनच! मुंडे असोत, नाही तर कोकाटे..दोघेही दादांच्या पक्षातील ! स्वारगेट येथे युवतीवर झालेल्या अत्याचारप्रकरणातील आरोपी देखील राष्ट्रवादी काँग्रेसचा कार्यकर्ता ! कदाचित, ही फडणवीस यांच्यासाठी संधी असून या गोष्टींचा वापर करून ते दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना बॅकफूटवर खेळणे भाग पाडतील असेच दिसते !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# हत्येत कराडच मास्टरमाईंड!

## आरोपपत्रात खंडणी, ॲट्रॉसिटी आणि हत्येचा एकत्रित उल्लेख

। परभणी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणी वाल्मिक कराड हाच मुख्य सूत्रधार असल्याचे सीआयडीने दाखल केलेल्या आरोपपत्रातून समोर येत आहे. अवादा कंपनीकडे मागितलेल्या खंडणीतून झालेल्या वादानंतर ही हत्या करण्यात आली, असा उल्लेख पोलिसांनी दाखल केलेल्या आरोप पत्रात करण्यात आला आहे. खंडणी, ॲट्रॉसिटी आणि हत्या या तिन्ही घटनांचा आरोप पत्रात एकत्रित उल्लेख करण्यात आला आहे.**

कटातील आरोपी असलेला कृष्णा आंधळे हा अद्याप फरार आहे. आरोप पत्रात फरार आरोपी कृष्णा आंधळे याचा नंबर आठव्या क्रमांकावर आहे. २६ फेब्रुवारी रोजी विशेष सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम यांना नियुक्त केले. संतोष देशमुख हत्या प्रकरणात सीआयडी बीडच्या विशेष मकोका कोर्टात वाल्मिक कराडसह आठ आरोपींच्या विरोधात एक आरोप पत्र दाखल झाले. हे साधारण १४०० पानांचे आरोपपत्र असून खंडणीसह अपहरणाच्या प्रकरणात मोठे उलगडे आणि गौप्यस्फोट होण्याची शक्यता आहे. आरोपींना फरार करण्यास मदत करणारे डॉ. संभाजी वायबसे दांपत्य, बालाजी तांदळे, संजय केदार, सारंग आंधळे यांची चौकशी करुन यांना तात्काळ सहआरोपी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

पोलिसांनी सादर केलेल्या आरोप पत्रात पहिल्या क्रमांकाचा गुन्हेगार हा वाल्मिक कराड आहे. विष्णू चाटे, तिसऱ्या क्रमांकावर सुदर्शन घुले आणि त्या खालोखाल प्रतीक घुले, सुधीर सांगळे, महेश केदार, जयराम चाटे, कृष्णा आंधळे यांचा समावेश आहे.यातील प्रमुख आरोपी हा सुदर्शन घुले असून त्यानेच सरपंच देशमुख यांना जबर मारहाण केल्याचा यात उल्लेख करण्यात आला आहे. तसेच संतोष देशमुख यांना घेऊन जाणारा व्यक्तीही सुदर्शन घुले होता. वाल्मिक कराड याला अटक केल्यानंतर त्याचा फिकट निळ्या रंगाचा आयफोन, सोनेरी रंगाचे अन्य दोन भ्रमणध्वनी संचही ताब्यात घेतले असून आरोपींशी झालेल्या संभाषणाच्या आधारे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. संतोष देशमुखा यांची हत्या ज्या लोखंडी लोखंडी पाईप, त्याला करदोड्याने बांधून बनवलेली मूठ, आरोपीच्या काळ्या रंगाच्या गाडीत तसेच पाईपला लागलेले रक्ताचे डाग यांचे उल्लेखही दोषारोपामध्ये करण्यात आले आहेत. आरोपींचे मोबाईल, त्यांच्या गाडीत सापडलेले टी शर्ट, गॉगल, एटीएम कार्ड, प्रादेशिक परिवहन विभागाने गाड्यांसाठी दिलेले प्लास्टिकचे कार्ड अशा अनेक वस्तू तपासकामी ताब्यात घेतल्याचा दोषारोप पत्रात उल्लेख आहेत.



खंडणीच्या गुन्ह्यात आडवे आले म्हणून संपवा अन्यथा आपण भिकेला लागू, असे म्हणत वाल्मिकच या गुन्ह्यातील सूत्रधार असल्याचे दोषारोपात म्हटले आहे. या आरोपींमधील सुदर्शन घुले आणि त्याचे साथीदार संघटित गुन्हेगारी करत होते.आठ ऑक्टोबर २०२४ रोजी अवादा एनर्जी प्रा.लि.चे जमीन अधिग्रहण अधिकारी शिवाजी थोपटे हे वाल्मीक कराड यांचे सांगणे वरुन वाल्मीक कराड याच्या परळी येथील ऑफिसमध्ये जाऊन भेटले. त्यावेळी विष्णु चाटे हा हजर होता. या वेळी वाल्मीक कराड याने, अवादा कंपनीची सर्व कामे बंद करा" अशी धमकी दिली. यावेळी प्रतिक घुले, सुधीर सांगळे व कृष्णा आंधळे हे कटामध्ये सामील झाले. वारंवार खंडणी मागुनही अवादा एनर्जी प्रा.लि. कंपनीने वाल्मीक कराडला खंडणी न दिल्यामुळे, दिनांक ०६/१२/२०२४ रोजी सुदर्शन घुले, प्रतिक घुले व सुधीर सांगळे हे अवादा एनर्जी प्रा. लि. कंपनीमध्ये गेले व तेथील सुरक्षा रक्षकास मारहाण करुन जातीवाचक शिवीगाळ केली. अवादा एनर्जी प्रा.लि. चे जमीन अधिग्रहण अधिकारी शिवाजी थोपटे यांना दोन कोटी रुपये दया नाहीतर कंपनी बंद करा. अशी धमकी देवुन शिवीगाळ व धक्काबुक्की केली. अवादा एनर्जी प्रा. लि. कंपनीमध्ये काम करणारे कर्मचारी यांनी फोन करुन सरपंचला सदर घटनेबाबत सांगितले. त्यावरुन मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हे त्या ठिकाणी गेले व संतोष देशमुख यांनी सुदर्शन घुले व त्यांचे साथीदारांना विनंती करुन, "कंपनी बंद करु नका. लोकांना रोजगार मिळु दया असे सांगितले.

### 'डिजिटल' स्वरुपाचे पुरावे

घुले याने सरपंच संतोष देशमुख यांनी खंडणी मागण्यात अडथळा निर्माण करत असल्याने संतोष देशमुख यांना वारंवार सरपंच तुला बघून घेतो. जीवंत सोडणार नाही, अशी विष्णू चाटे धमकी देत होता. दरम्यान ७ डिसेंबर रोजी रोजी सुदर्शन घुले याने वाल्मीक कराड यास कॉल केला त्यावेळी वाल्मीक कराड याने सुदर्शन घुले यास सांगितले की, " जो तो उठेल आणि आपल्या आड येईल तर आपण भिकेला लागू असेच होत राहिले तर कोणतीही कंपनी आपल्याला खंडणी देणार नाही. आता जो कोणी आड येईल त्याला आडवा करावाच लागेल. कामाला लागा अशा सूचना केल्या.

# फडणवीसांचा शिंदेंना आणखी एक धक्का

## आरोग्य विभागाच्या 3,200 कोटी रुपयांच्या कामांना दिली स्थगिती

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात घेतलेल्या काही निर्णयांना विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा शिंदे सरकारच्या काळात आरोग्य विभागासाठी घेतलेला निर्णय स्थगित करण्यात आला आहे. माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या काळात दिलेले ३,२०० कोटी रुपयांचे काम रद्द करण्यात आले आहे.**



महायुती सरकारमध्ये दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाल्यानंतर आपल्या पक्षाच्या विस्ताराच्या निमित्ताने अजित पवार प्रथमचएकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना तानाजी सावंत यांच्याकडे आरोग्य खात्याची जबाबदारी होती. यावेळी अधिकाऱ्यांच्या बदल्या, रुग्णवाहिका खरेदी यामध्ये अनियमितता झाल्याचा आरोप केला गेला होता. तसेच आरोग्य विभागाच्या अंतर्गत येणारी सर्व शासकीय रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रे यांना बाह्य यंत्रणेद्वारे सापसफाई करण्याचे काम देण्यात आले होते. यासाठी प्रतिवर्षी ६३८ कोटी रुपये याप्रमाणे तीन वर्षांसाठी ३,१९० कोटी रुपयांचे कंत्राट पुण्यातील एका खासगी कंपनीला देण्यात आले होते. मात्र या कंत्राटाला आता स्थगिती देण्यात आली आहे.दरम्यान या निर्णयावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात सुरू असलेले सुप्त द्वंद कारणीभूत असल्याचा संशय विरोधक व्यक्त करत आहेत. पण शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मात्र वेगळीच प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, सदर निर्णयामागे पक्षीय कारण नाही. फक्त आरोग्य विभागच नाही तर प्रत्येक सरकारी विभागाने नियमानुसार काम केले पाहिजे. आम्ही जनतेला उत्तरदायी आहोत.दरम्यान शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते संजय राऊत यांनीही या निर्णयाचे स्वागत केले आहे. ते म्हणाले, एकनाथ शिंदे यांच्या काळात जी कामे झाली, त्यात केवळ भ्रष्टाचारच झाला. शिंदेंच्या काळात आरोग्य मंत्री कोण होते, हे सर्वांना माहीत आहे. भाजपातून भ्रष्ट मंत्र्यांचा विरोध केले गेला होता. त्यापैकीच एक आरोग्य मंत्रीही होते. सार्वजनिक आरोग्य खाते थेट जनतेशी संबंधित असते. पण त्या खात्यात भ्रष्टाचार होत असेल तर योग्य नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हा भ्रष्टाचार थांबवत असतील तर त्यांचे आम्ही स्वागतच करू.

### राऊत यांच्याकडून निर्णयाचे स्वागत


यावेळी अधिकाऱ्यांच्या बदल्या, रुग्णवाहिका खरेदी यामध्ये अनियमितता झाल्याचा आरोप केला गेला होता. तसेच आरोग्य विभागाच्या अंतर्गत येणारी सर्व शासकीय रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रे यांना बाह्य यंत्रणेद्वारे सापसफाई करण्याचे काम देण्यात आले होते.

# देशात मराठी-हिंदी-इंग्रजीला पसंती

## मराठी-हिंदी-इंग्रजी भाषा बोलणाऱ्यांची संख्या सुमारे 1 कोटी

**| नवी दिल्ली | प्रतिनिधी : महाईन्यूज |**

**१९६८ मध्ये, इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारने तयार केलेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात त्रिभाषा सूत्र सादर करण्यात आले होते. हिंदी-इंग्रजीवर आधारित या धोरणात हिंदी भाषिक राज्यांमध्ये दक्षिणेकडील भाषा आणि हिंदी नसलेल्या राज्यांमध्ये प्रादेशिक भाषा ही तिसरी भाषा म्हणून शिकवण्याची तरतूद होती. तेव्हापासून त्रिभाषा सूत्र हा वादाचा मुद्दा ठरत आहे.**



१९६८ मध्ये, तामिळनाडूने या धोरणाला विरोध केला होता आणि तेव्हापासून ते स्वतःच्या द्विभाषिक सूत्रावर कायम आहे. सध्या, द्रमुकच्या नेतृत्वाखालील तामिळनाडू सरकारचा भाजपाशासित केंद्र सरकारशी राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० वरून वाद सुरू आहे. तामिळनाडू त्रिभाषा सूत्रावर ठाम आहे.केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी असे सूचित केले की, राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) लागू करेपर्यंत आणि त्रिभाषिक नियम स्वीकारेपर्यंत शालेय शिक्षणासाठी समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत केंद्र सरकार निधी देणार नाही. त्यानंतर तामिळनाडू आणि केंद्र सरकार यांच्यातील वादाला सुरुवात झाली. यानंतर तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन म्हणाले की, "तमिळ लोक अशा ब्लॅकमेलिंगला स्वीकारणार नाहीत. कोणत्या घटनात्मक तरतुदीमुळे त्रिभाषा सूत्र अनिवार्य झाले आहे. हे सूत्र केवळ "हिंदी लादण्याचे" एक स्वरूप आहे." यावर केंद्र सरकारने असा युक्तिवाद केला आहे की, कोणत्याही राज्यावर कोणतीही विशिष्ट भाषा लादली जाणार नाही. १९६८ आणि २०२० मध्ये, त्रिभाषिक सूत्राचे उद्दिष्ट बहुभाषिकतेला प्रोत्साहन देणे होते. पण, २०११ च्या जनगणनेतील आकडेवारीवरून असे दिसून येते की, भारतात भाषिक विविधता असूनही, केवळ आठ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील लोकांनाच दोनपेक्षा जास्त भाषा बोलता येतात. २०११ च्या जनगणनेनुसार, राष्ट्रीय पातळीवर, लोकसंख्येच्या २६.०२% संख्या द्विभाषिक आहे आणि ७.१% लोक त्रिभाषिक आहेत. २००१ च्या जनगणनेत द्विभाषिक लोकसंख्या २४.७९% वरून वाढली होती, तर त्रिभाषिक भाषिकांचा वाटा ८.५१% वरून घसरला आहे. २००१ ते २०११ दरम्यान, १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये द्विभाषिकता कमी झाली, तर २३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये त्रिभाषिकता कमी झाली. तमिळनाडू, त्यांच्या द्विभाषिक सूत्राचे पालन करूनही, २०११ मध्ये द्विभाषिक लोकसंख्येच्या वाट्यामध्ये २८.३% सह १५ व्या क्रमांकावर आहे. तर तामिळनाडूमध्ये ३.३९% लोकसंख्या त्रिभाषिक आहे. यामध्ये ते खालून आठव्या स्थानावर आहेत.बहुभाषिकतेमध्ये सर्वोत्तम कामगिरी करणारे राज्य गोवा आहे. गोव्यातील ७७.२१% लोकसंख्या द्विभाषिक आहे आणि ५०.८२% लोकसंख्या त्रिभाषिक आहे. गोवा हे एकमेव राज्य आहे जिथे त्रिभाषिकता ५०% पेक्षा जास्त आहे, त्यानंतर चंदीगड ३०.५१% आणि अरुणाचल प्रदेश ३०.२५% आहे. द्विभाषिकतेचे जास्त प्रमाण असलेल्या इतर राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये अंदमान आणि निकोबार (६७.६४%), अरुणाचल प्रदेश (६४.०३%), सिक्कीम (६३.७१%), नागालँड (६२.१५%), चंदीगड (५४.९५%), मणिपूर (५४.०२%) आणि महाराष्ट्र (५१.१%) यांचा समावेश आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, द्विभाषिकांसाठी वापरल्या जाणाऱ्या १० सर्वात सामान्य भाषा मिश्रणांपैकी (कॉम्बिनेशन) आठ भाषांमध्ये हिंदीचा समावेश आहे. ३.४७ कोटी भाषिकांसह, मराठी-हिंदी हे सर्वात सामान्य द्विभाषिक मिश्रण आहे, त्यानंतर हिंदी-इंग्रजी ३.२ कोटी, गुजराती-हिंदी २.१७ कोटी, उर्दू-हिंदी १.८६ कोटी आणि पंजाबी-हिंदी १.५५ कोटी आहेत. दुसरीकडे तमिळ-इंग्रजी १.२३ कोटी आणि तेलुगू-इंग्रजी ८०.७५ लाख हे फक्त दोन मिश्रण आहेत ज्यात हिंदी भाषेचा समावेश नाही.२०११ मध्ये, त्रिभाषिकांमध्ये, मराठी-हिंदी-इंग्रजी हे सर्वात सामान्य मिश्रण होते. जे १.०१ कोटी आहे, त्यानंतर पंजाबी-हिंदी-इंग्रजी ७७.९९ लाख, गुजराती-हिंदी-इंग्रजी ६६.३२ लाख, तेलुगू-इंग्रजी-हिंदी २५.०४ लाख आणि मल्याळम-इंग्रजी-हिंदी २४.७६ लाख आहे. १० सर्वात सामान्य त्रिभाषिक मिश्रणांपैकी प्रत्येकामध्ये हिंदी आणि इंग्रजी आहे. हिंदीचा समावेश नसलेले सर्वात जास्त बोलले जाणारे त्रिभाषिक मिश्रण काश्मिरी-उर्दू-इंग्रजी आहे जे ६४.७९ लाख आहे.

### बहुभाषिकतेमध्ये गोवा अव्वल

जे १.६ लाख आहे.बहुभाषिकतेमध्ये सर्वोत्तम कामगिरी करणारे राज्य गोवा आहे. गोव्यातील ७७.२१% लोकसंख्या द्विभाषिक आहे आणि ५०.८२% लोकसंख्या त्रिभाषिक आहे. गोवा हे एकमेव राज्य आहे जिथे त्रिभाषिकता ५०% पेक्षा जास्त आहे, त्यानंतर चंदीगड ३०.५१% आणि अरुणाचल प्रदेश ३०.२५% आहे.

# एलॉन मस्क आता १४ मुलांचा बाप

## जोडीदार शिवोन झिलीस यांनी दिला चौथ्या मुलाला जन्म

**| नवी दिल्ली | प्रतिनिधी : महाईन्यूज |**

**न्यूरालिंकच्या एक्झिक्युटिव्ह आणि एलॉन मस्क यांच्या जोडीदार शिवोन झिलीस यांनी चौथ्या बाळाला जन्म दिल्याची घोषणा एक्सवर पोस्टद्वारे केली आहे. झिलीस यांची तिसऱ्या क्रमांकाची मुलगी आर्केडियाचा पहिला वाढदिवस झाल्याच्या निमित्त चौथ्या बाळाची बातमी त्यांनी दिली. या बाळाचे नाव सेल्डन लायकर्गस ठेवल्याचेही त्यांनी सांगितले आहे.**






विशेष म्हणजे झिलीस आणि मस्क यांनी तिसऱ्या बाळाची माहिती आजवर जाहीर केलेली नव्हती. सेल्डन हा त्यांचा आता चौथा मुलगा आहे. माध्यमातील बातम्यांनुसार आर्केडियाचा जन्म २०२४ च्या सुरुवातीला झाला होता.शिवोन झिलीस यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले, "मस्क आणि मी आमच्या मुलाची बातमी सार्वजनिक करत आहोत. आमच्या मुलीच्या वाढदिवसानिमित्त एलॉन मस्कशी चर्चा करून आम्ही ही बातमी देत आहोत. आमच्या मुलाचे सेल्डन लायकर्गस ठेवले आहे. टेस्ला कंपनीचे प्रमुख एलॉन मस्क यांनी आतापर्यंत १२ मुलांना जन्म दिल्याचे बोलले जात होते. त्यापैकी शिवोन झिलीस यांनी आता तिसऱ्या आणि चौथ्या बाळाची माहिती दिली आहे. याआधी त्यांना दोन जुळी मुले आहेत.काही दिवसांपूर्वी एन्फ्लुएन्सर अॅशले सेंट क्लेअर पाच महिन्यांपूर्वी मस्क यांच्या बाळाला जन्म दिल्याचा दावा केला. क्लेअरची एक्स पोस्ट सध्या सर्वत्र व्हायरल झाली होती. तसेच मस्क यांची जोडीदार ग्रिम्स यांनी त्यांच्या मुलाच्या वैद्यकीय गरजांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोपही केला होता. एलॉन मस्क यांचा वडिल म्हणून इतिहास गुंतागुंतीचा आहे. २००२ मध्ये त्यांना पहिली पत्नी जस्टीन विल्सनकडून नेवाडा अलेक्झांडर मस्क हा मुलगा झाला होता. मात्र त्याचे निधन झाले. त्यानंतर आयव्हीएफ तंत्रज्ञानाद्वारे त्यांना जुळी आणि तिळी मुले झाली. त्यानंतर संगीतकार ग्रिम्स यांच्याकडून त्यांना तीन मुले झाली.झिलीस आणि मस्क यांनी तिसऱ्या बाळाची माहिती आजवर जाहीर केलेली नव्हती. सेल्डन हा त्यांचा आता चौथा मुलगा आहे. माध्यमातील बातम्यांनुसार आर्केडियाचा जन्म २०२४ च्या सुरुवातीला झाला होता.शिवोन झिलीस यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले, "मस्क आणि मी आमच्या मुलाची बातमी सार्वजनिक करत आहोत. आमच्या मुलीच्या वाढदिवसानिमित्त एलॉन मस्कशी चर्चा करून आम्ही ही बातमी देत आहोत. मुलाचे सेल्डन लायकर्गस ठेवले आहे.टेस्ला कंपनीचे प्रमुख एलॉन मस्क यांनी आतापर्यंत १२ मुलांना जन्म दिल्याचे बोलले जात होते. त्यापैकी शिवोन झिलीस यांनी आता तिसऱ्या आणि चौथ्या बाळाची माहिती दिली आहे. याआधी त्यांना दोन जुळी मुले आहेत. एलॉन मस्क सध्या 14 मुलांचा बाप आहेत.

### एलॉन मस्कला दोन जुळी मुले आहेत

काही दिवसांपूर्वी एन्फ्लुएन्सर अॅशले सेंट क्लेअर पाच महिन्यांपूर्वी मस्क यांच्या बाळाला जन्म दिल्याचा दावा केला. क्लेअरची एक्स पोस्ट सध्या सर्वत्र व्हायरल झाली होती. तसेच मस्क यांची जोडीदार ग्रिम्स यांनी त्यांच्या मुलाच्या वैद्यकीय गरजांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोपही केला होता.

# ९०च्या दशकातील गाण्यावर सूर्या, काजू व पुड्याचा जबरदस्त डान्स

नितीश चव्हाण हा अभिनेता 'लागिरं झालं जी' मालिकेमुळे घराघरांत पोहोचला. आजही प्रेक्षक त्याला अनेकदा आज्या, फौजी असे संबोधताना दिसतात. या मालिकेतील त्याच्या अभिनयामुळे त्याचा मोठा चाहतावर्ग निर्माण झाला. सध्या अभिनेता 'लाखात एक आमचा दादा' या मालिकेत प्रमुख भूमिकेत दिसत आहे. या मालिकेत अभिनेत्याने सूर्या ही भूमिका साकारली आहे. सूर्या दादा आपल्या बहिणींसाठी हिरो आहे. तेजू, भाग्या, धनश्री व राजश्री या त्याच्या चार बहिणींवर त्याचे खूप प्रेम आहे. तो त्यांना आई-वडिलांची माया देतो. त्यांना कोणताही त्रास होऊ नये म्हणून काळजी घेतो. तसेच त्याची पत्नी तुळजा व त्याची जोडीसुद्धा प्रेक्षकांना आवडते. सूर्या दादाचे दोन जीवलग मित्र काजू व पुड्या हे नेहमी त्याच्या मदतीसाठी धावून येताना दिसतात. आता मात्र सूर्या, काजू व पुड्या वेगळ्याच कारणांमुळे चर्चेत आले आहेत. 'लाखात एक आमचा दादा'मधील सूर्या, काजू व पुड्या चर्चेत येण्याचे कारण म्हणजे



नितीश चव्हाणने शेअर केला आहे. व्हिडीओ शेअर करताना "हवा हवा...आपलीच हवा" अशी कॅप्शन दिली आहे. तसेच स्वप्नील कणसे व महेश जाधव यांच्या अकाउंटला टॅग केले आहे. आता हा

त्यांनी शेअर केलेला व्हिडीओ आहे. सूर्या, काजू व पुड्या यांनी 'हवा हवा ये हवा' या गाण्यावर डान्स केला आहे. यावेळी त्यांच्या डान्स स्टेप्स तसेच त्यांच्या चेहऱ्यावरील हावभाव लक्ष वेधून घेत आहेत. हा व्हिडीओ

प्रेक्षकांना आवडत असल्याचे दिसत आहे.अनेक चाहत्यांनी या कलाकारांचे कौतुक केले आहे. एका चाहत्याने म्हटले, "दोस्तीपेक्षा जास्त काही नाही", आणखी एका नेटकऱ्याने म्हटले, "तुमचीच हवा आहे सध्या सगळीकडे", दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिले, "वाह", "झक्कास", तसेच काहींनी हार्ट इमोजी शेअर करत प्रेम व्यक्त केले आहे. पारू मालिकेत अनुष्काची भूमिका साकारणाऱ्या श्वेता खरातनेदेखील इमोजी शेअर करीत त्यांचे कौतुक केले आहे.मालिकेतील हे व इतर कलाकार डान्स, विनोदी रील्स या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत असतात. सोशल मीडियावरील त्यांच्या व्हिडीओंना प्रेक्षकांची चांगली पसंती मिळत असल्याचे पाहायला मिळते. महेश जाधव व नितीश चव्हाण यांनी 'लाखात एक आमचा दादा' मालिकेआधी 'लागिरं झालं जी' मालिकेतसुद्धा एकत्र काम केले आहे.दरम्यान, 'लाखात एक आमचा दादा' मालिकेत नुकत्याच समोर आलेल्या प्रोमोमध्ये सूर्याला शत्रूचे खरे रूप समजल्याचे पाहायला मिळाले.

## साता जन्माचे सोबती!

बॉलीवूडमध्ये अनेक सेलिब्रिटींनी आंतरधर्मीय लग्न केले आहे. या फोटोत दिसत असलेल्या जोडप्याच्या आंतरधर्मीय लग्नाला २५ वर्षांहून जास्त काळ उलटला आहे. हे लोक आनंदाने संसार करत आहेत. या दोघांची पहिली भेट एका टीव्ही शोदरम्यान झाली होती, नंतर ते प्रेमात पडले आणि त्यांनी लग्न केलं. लग्नाला २७ वर्षे झाली असली तरी या हिंदू अभिनेत्रीने कधीच मुस्लीम पतीचं आडनाव लावलं नाही. त्यामागचं कारण काय, तेही तिने सांगितलं होतं. हे जोडपं म्हणजे 'बजरंगी भाईजान'चा दिग्दर्शक कबीर खान व त्याची पत्नी मिनी माथूर होय.नेहा धुपियाच्या शो 'नो फिल्टर नेहा' सीझन ५ मध्ये कबीर खानने त्याची व मिनी माथूरची सुंदर प्रेमकहाणी सांगितली होती. "मिनी आणि मी खरं तर एकत्र काम न करण्याचा निर्णय घेतला, कारण आम्ही दोघेही एकाच क्षेत्रातले आहोत. आम्ही आमचे पर्सनल आणि प्रोफेशन आयुष्य वेगळे ठेवले आहे. पण आमची भेट एका शूटमध्ये झाली होती, त्यामुळे आम्ही एकत्र शूटिंग केले आहे. होम टीव्ही नावाचे एक चॅनल होते.

## तुझ्याकडे काय मंत्र आहे?

मालिका असो वा चित्रपट, अभिनेत्री प्रार्थना बेहेरे ही नेहमीच तिच्या अभिनयामुळे चर्चेत असते. 'मितवा', 'कॉफी आणि बरच काही', 'बाई गं', असे चित्रपट 'जुळून येती रेशीमगाठी' या मालिकेतील तिची भूमिका सर्वांच्याच लक्षात आहे. आता अभिनेत्री एका नव्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. प्रसाद खांडेकर दिग्दर्शित 'चिकी चिकी बुबूम बुम' या चित्रपटातून ती प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. याबरोबरच अभिनेत्रीला नुकत्याच एका मुलाखतीत तिला तिच्या महिन्याच्या खर्चाबद्दल विचारले. त्यावर तिने काय उत्तर दिले हे जाणून घेऊयात. अभिनेत्री प्रार्थना बेहेरेने नुकतीच 'सुमन म्युझिक मराठी'च्या 'आम्ही असं ऐकलंय' या शोमध्ये हजेरी लावली. या मुलाखतीत अभिनेत्रीने तिच्या आयुष्यातील अनेक गोष्टींवर वक्तव्य केले. तिची १५ मुले म्हणजे नक्की कोण, याचादेखील तिने खुलासा केला. याबरोबरच व्यावसायिक व अनेक खासगी गोष्टींबाबत तिने वक्तव्य केले. याच मुलाखतीत अभिनेत्रीला तिचा महिन्याचा खर्च विचारण्यात आला. यावर बोलताना अभिनेत्रीने म्हटले, "खूप आहे, कितीही पैसे कमावले तरी कमीच पडतात, खूप खर्च आहे", असे उत्तर दिले.



## 'शिवा' मालिकेत काय घडणार?

प्रत्येक मालिकेत जसे सकारात्मक पात्रे असतात, तशीच नकारात्मक पात्रेदेखील असतात. ही पात्रे कट कारस्थान करताना दिसतात. नायक नायिकेच्या विरोधात काही वाईट गोष्टी करताना दिसतात. मात्र, सर्व पद्धतीच्या पात्रांमुळे एखाद्या मालिकेला वेगळी ओळख निर्माण होते. नायक-नायिकांसह खलनायकाची भूमिका साकारणाऱ्या कलाकारांनादेखील मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळताना दिसते. आता 'शिवा'(SHIVA) मालिकेत किर्ती व दिव्या सतत शिवा व आशूविरूद्ध कट कारस्थान करताना दिसतात. आता मात्र समोर आलेल्या प्रोमोमध्ये किर्तीला सीताई कानाखाली मारणार असल्याचे दिसत आहे. झी मराठी वाहिनीने सोशल मीडियावर शिवा मालिकेचा एक प्रोमो शेअर केला आहे. या प्रोमोमध्ये पाहायला मिळते की,शिवाच्या घरातील सर्वजण आशू व शिवाची वाट पाहत आहेत. तितक्यात शिवा व आशू घरी येतात. त्यांना पाहून सर्वांना आनंद होतो. पण त्यांना पाहून शिवाची बहीण किर्ती म्हणते, "तुम्हा सगळ्यांचं हे जे काही चालू आहे ना, ते मला अजिबात पटत नाहीये. त्यामुळे मी त्यांना आत येऊ देणार नाहीये. मान वर करून घर सोडून निघून गेला होता ना. आता कशाला परत आलाय? किर्तीचे बोलणे ऐकून आशू म्हणतो, आईसाठी परत आलोय. त्यावर किर्ती म्हणते, जाताना हा विचार केला नाहीस. सिताई किर्तीला बोलण्यापासून थांबवण्याचा प्रयत्न करते. पण किर्ती तिचे बोलणे थांबवत नाही.आशू मुलगा म्हणायच्या लायकीचा सुद्धा नाही. किर्तीचे हे बोलणे ऐकल्यानंतर सिताईचा संताप अनावर होतो आणि ती किर्तीला कानाखाली मारते.

## सुपारी फुटली! विद्याचा मराठमोळा अंदाज

विद्या बालनने बॉलीवूड इंडस्ट्रीत स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. नेहमीपेक्षा काहीसं हटके कथानक आणि नवीन आशयांच्या चित्रपटांमध्ये काम करणारी अभिनेत्री म्हणून विद्याला ओळखलं जातं. 'भूल भुलैया', 'कहाणी', 'द दर्टी पिक्चर', 'परिणीता', 'लगे रहो मुन्ना भाई' अशा एकापेक्षा एक दमदार चित्रपटांमध्ये विद्याने काम केलेलं आहे. यासाठी तिला अनेक पुरस्कारांनी सुद्धा सन्मानित करण्यात आलेलं आहे. मध्यंतरीच्या काळात विद्या बालन सिनेविश्वापासून काहिशी दूर होती. यानंतर गेल्यावर्षी प्रदर्शित झालेल्या 'भुल भुलैय्या ३' या सिनेमातून तिने पुन्हा एकदा रुपेरी पडद्यावर दमदार पुनरागमन केलं. विद्या अभिनय क्षेत्राच्या बरोबरीने आता सोशल मीडियावर सुद्धा चांगलीच सक्रिय झाली आहे. ती विविध रील्स व्हिडीओ शेअर करून प्रेक्षकांचं मनोरंजन करत असते. नुकताच विद्याने मराठमोळ्या अंदाजात एक डान्सचा व्हिडीओ शेअर केला आहे. यामध्ये अभिनेत्री 'नवरी नटली...' या लोकप्रिय गाण्यावर डान्स करत असल्याचं पाहायला मिळत आहे. विद्या बालन तिच्या सोशल मीडियावर अनेकदा मराठी रील्स शेअर करत असते. मध्यंतरी अभिनेत्रीने मराठी विनोदवीर भाऊ कदमच्या 'चला हवा येऊ द्या' या शोमधील गाजलेल्या स्किटवर मजेशीर व्हिडीओ बनवला होता. आता विद्याने लोकप्रिय मराठी गाण्यावर ठेका धरल्याचं पाहायला मिळत आहे. सध्याच्या काळात सोशल मीडियावर अनेक जुनी गाणी ट्रेंड होत आहेत. "खंडेरायाच्या लग्नाला बानू नवरी नटली, नवरी नटली काल बाई सुपारी फुटली" या गाण्यावर सुंदर असे एक्स्प्रेशन्स देत विद्या बालनने डान्स केला आहे.



# इंग्लंडचहीे नशीब पाकिस्तानसारखंच!

## दक्षिण आफ्रिकेचा इंग्लंडवर 125 चेंडू राखून विजय

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दक्षिण आफ्रिकेने आपली दमदार कामगिरी सुरू ठेवत चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या उपांत्य फेरीत सहज प्रवेश केला आहे. गट टप्प्यातील आपल्या शेवटच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने इंग्लंडचा एकतर्फी सामन्यात ७ गडी राखून आणि १२५ चेंडू राखून पराभव केला आणि अंतिम चारमध्ये आपले स्थान निश्चित केले.**



सामना संपण्यापूर्वीच दक्षिण आफ्रिकेने उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्रता मिळवली होती, मात्र या विजयासह त्यांनी ब गटात पहिले स्थान मिळवले. तर इंग्लंडचा संघ चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये एकाही सामन्यात न विजय मिळवता माघारी जाणार आहे.इंग्लंड संघाप्रमाणेच पाकिस्तानचा संघही चॅम्पियन्स ट्रॉफीत एकही सामना जिंकू शकला नव्हता. इंग्लंडचा संघ गट टप्प्यातील तिन्ही सामन्यात पराभूत झाला. तर पाकिस्तानने दोन सामने गमावले आणि एक सामना पावसामुळे रद्द झाला. तर बांगलादेशचा संघही चॅम्पियन्स ट्रॉफीत एकही सामना न जिंकता बाहेर पडला.

कराचीच्या नॅशनल स्टेडियमवर शनिवारी १ मार्च रोजी खेळला जाणारा हा सामना दुसरा उपांत्य फेरीतील संघ ठरवण्यासाठी खेळवला गेला. पण दक्षिण आफ्रिकेचे उपांत्य फेरी गाठणे जवळपास निश्चित झाले होते. अफगाणिस्तानला उपांत्य फेरी गाठण्यासाठी इंग्लंडला दक्षिण आफ्रिकेवर मोठा विजय आवश्यक होता. पण दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात आपल्या गोलंदाजीच्या जोरावर ही शक्यता संपुष्टात आणली आणि उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यानंतर संघाच्या फलंदाजांनी दमदार फलंदाजी करत सहज लक्ष्य गाठले.

इंग्लंड संघाचा कर्णधार जोस बटलर याने इंग्लंडची वनडे क्रिकेटमधील कामगिरी पाहता वनडे संघाचा कर्णधार म्हणून राजीनामा दिला. दक्षिण आफ्रिकेविरूद्धच्या सामन्यापूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत त्याने हा निर्णय घेतला. दक्षिण आफ्रिकेच्या संघाविरूद्धचा त्याचा वनडे संघाचा कर्णधार म्हणून हा अखेरचा सामना होता, पण या सामन्यात लाजिरवाण्या पद्धतीने संघ पराभूत झाला.इंग्लंडने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला पण हा निर्णय अगदी चुकीचा ठरला. इंग्लंड संघ आफ्रिकेच्या भेदक गोलंदाजीसमोर फार काळ टिकू शकला नाही. संघातील एकही खेळाडू ४० धावाही करण्यात अपयशी ठरला. जो रूटने सर्वाधिक ३७ धावांची खेळी केली. तर इतर सर्व फलंदाज २०-२५ धावा करत बाद झाले आणि परिणामी संघ १७९ धावांमध्ये सर्वबाद झाला. आफ्रिकेकडून मार्को यान्सन आणि वियान मुल्डर यांनी प्रत्येकी ३ विकेट घेतले. तर केशव महाराज २ विकेट आणि एनगिडी-रबाडाने प्रत्येकी १ विकेट घेतली.

### ड्युसेनने 72 धावांची खेळी केली

इंग्लंडच्या संघाने दिलेल्या १८० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आफ्रिकेने अवघ्या २९ षटकांत विजय मिळवला. रायन रिकल्टनने २५ चेंडूत २७ धावा केल्या, तर ट्रिस्टन स्टब्स खातेही न उघडता आर्चरच्या गोलंदाजीवर क्लीन बोल्ड झाला. यानंतर रॅसी व्हॅन डेर ड्युसेनने ३ षटकार आणि ६ चौकारांसह सर्वाधिक ७२ धावांची खेळी केली. तर दुखापतीतून परतलेल्या हेनरिक क्लासेनने ५६ चेंडूत ११ चौकारांसह ६४ धावांची खेळी करत संघाचा विजय निश्चित केला. तर डेव्हिड मिलरने विजयी षटकार लगावत संघाला मोठा विजय मिळवून दिला.दक्षिण आफ्रिकेने आपली दमदार कामगिरी सुरू ठेवत चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या उपांत्य फेरीत सहज प्रवेश केला आहे. गट टप्प्यातील आपल्या शेवटच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने इंग्लंडचा एकतर्फी सामन्यात ७ गडी राखून आणि १२५ चेंडू राखून पराभव केला आणि अंतिम चारमध्ये आपले स्थान निश्चित केले.

# करूण नायरने शानदार शतक झळकावले

## नायरने हेल्मेट खाली ठेवत बोटांनी नऊचा आकडा दाखवला

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचा वादळी फलंदाजी करणारा फलंदाज करूण नायरने आपल्या शानदार फॉर्मने धावांचा पाऊस पाडला आहे. करूण नायर गेल्या बऱ्याच महिन्यांपासून देशांतर्गत क्रिकेटमध्ये खोऱ्याने धावा करत आहे. विजय हजारे ट्रॉफीमध्ये शतकं झळकावणाऱ्या विदर्भचा कर्णधार करुण नायरने रणजी ट्रॉफीमध्येही हाच फॉर्म कायम ठेवत अंतिम सामन्यात शानदार शतक झळकावले.**



केरळविरुद्धच्या या अंतिम सामन्याच्या पहिल्या डावात शतक हुकलेल्या नायरने दुसऱ्या डावात त्याची भरपाई केली. नागपुरात खेळल्या जाणाऱ्या रणजी ट्रॉफी २०२४-२५ हंगामातील विजेतेपद सामन्याच्या चौथ्या दिवशी विदर्भाने दुसऱ्या डावात फलंदाजीला सुरुवात केली. पहिल्या डावात या संघाला केरळवर ३७ धावांची आघाडी मिळाली होती, पण दुसऱ्या डावात त्यांची सुरुवात खूपच खराब झाली. केरळने अवघ्या ७ धावांत २ विकेट गमावल्या होत्या. विदर्भाचा डाव अडचणीत आल्याचे दिसत होते आणि अशा परिस्थितीत पहिल्या डावातील दोन हिरो दानिश मलेवार आणि करूण नायर यांनी संघाची धुरा सांभाळली.दानिश मलेवार आणि करूण नायर यांनी मिळून १८२ धावांची भागीदारी केली. दानिशने पहिल्या डावात शतक झळकावले होते, तर यावेळी तो ७३ धावा करून बाद झाला. दुसरीकडे पहिल्या डावात ८६ धावा करणाऱ्या नायरने यावेळी आपले शतक पूर्ण केले. भारतासाठी कसोटी क्रिकेटमध्ये त्रिशतक झळकावणाऱ्या या स्टार फलंदाजाने या मोसमातील चौथे आणि प्रथम श्रेणी क्रिकेटमधील २३वे शतक १८४ चेंडूत झळकावले. या देशांतर्गत हंगामात करुणने नवव्यांदा शतक ठोकले आहे.९९ धावांवर खेळत असलेल्या करूण नायरने एक धाव घेत आपले शतक पूर्ण केले. करूणने शतक पूर्ण होताच हेल्मेट काढून बॅट उंचावत आपल्या शतकाचा आनंद साजरा केला. यानंतर त्याने बॅट आणि हेल्मेट खाली ठेवत बोटांनी नऊचा आकडा दाखवला. करूणचे हे एका देशांतर्गत हंगामातील नववे शतक आहे.

### निवड समितीला संदेश

नववे शतक पूर्ण झाले असल्याचे त्याने दाखवले. जणू काही तो भारतीय क्रिकेट संघाच्या निवड समितीला संदेश देत असल्याचे त्याच्या या सेलिब्रेशनवरून वाटत होते.नायरच्या या शतकाने विदर्भाला २५० हून अधिक धावांची आघाडी मिळवून दिली आणि संघाची ट्रॉफीवरील पकड मजबूत केली. विशेष म्हणजे दीड वर्षांपूर्वी नायरची केरळकडून खेळण्याची इच्छा होती. मूळचा कर्नाटककडून खेळणाऱ्या नायरला २०२३ च्या हंगामापूर्वी कर्नाटक संघातून वगळण्यात आले होते.\ रणजी ट्रॉफीच्या फायनलपूर्वी नायरने खुलासा केला होता की त्याला कर्नाटकच्या संघाचून वगळल्यानंतर त्याने केरळकडून खेळण्याची इच्छा व्यक्त केली होती आणि केरळ क्रिकेट असोसिएशनला प्रस्तावही दिला होता, पण पुढे काही घडलं नाही. त्यामुळे ते विदर्भाकडून क्रिकेट खेळण्यासाठी वळला आणि आता त्याने केरळविरूद्धच अंतिम फेरीत शतक झळकावत आपला क्लास दाखवून दिला आहे.केरळविरुद्धच्या या अंतिम सामन्याच्या पहिल्या डावात शतक हुकलेल्या नायरने दुसऱ्या डावात त्याची भरपाई केली.नागपुरात खेळल्या जाणाऱ्या रणजी ट्रॉफी २०२४-२५ हंगामातील विजेतेपद सामन्याच्या चौथ्या दिवशी विदर्भाने दुसऱ्या डावात फलंदाजीला सुरुवात केली. पहिल्या डावात या संघाला केरळवर ३७ धावांची आघाडी मिळाली होती.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। रविवार ।
। दि. 2 मार्च 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# आकुर्डीमध्ये मराठी भाषा गौरव दिनानिमित्त काव्यवाचन!

## शिक्षण विश्व: एसबी पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी-चिंचवड । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) आकुर्डी येथील एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाइनमध्ये नुकताच मराठी भाषा गौरव दिनानिमित्त काव्यवाचन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले .**



या उपक्रमामध्ये विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कुसुमाग्रज, शांत शेळके, ग. दि. माडगूळकर, बहिणाबाई यांच्या कवितांचे सादरीकरण केले. सिद्धी भगत, कादंबरी कुंभार, सुदर्शन तौर, ऋतुजा वारिंगे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच आर्किटेक्ट स्वप्नील सेठ यांनी मराठी भाषेतील शब्दांची व्याप्ती आणि त्यांचे अनोखेपण याबद्दल माहिती दिली. विद्यार्थ्यांनी नियमितपणे मराठी साहित्याचे वाचन करून स्वरचित कविता, लेख, मनातील संकल्पना व्यक्त करण्याचा प्रयत्न करावा असे प्राचार्य स्मिता सूर्यवंशी यांनी सांगितले. ग्रंथपाल पूनम सांगळे यांनी आयोजनात सहभाग घेतला होता. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.




Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

# विद्यार्थिनीने बुरखा घातल्याने दहावी परीक्षेस प्रवेशास नकार

## निगडीतील प्रकार; संतप्त पालकाची पोलिसांकडे धाव

। पिंपरी-चिंचवड । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी, १ मार्च (प्रतिनिधी) दहावीच्या परीक्षेला येताना एका मुलीने बुरखा घातला होता. त्यामुळे शाळेने त्या मुलीला दहावीच्या परीक्षेसाठी प्रवेश नाकारला. त्यावेळी पालकांनी पोलिसांकडे धाव घेतली. पोलिसांच्या मध्यस्थीनंतर त्या मुलीला शनिवारी (दि. १ मार्च) परीक्षेला बसण्यास दिले. मात्र, सोमवारी होणाऱ्या परीक्षेस बसू देणार नाही, अशी भूमिका शाळेने घेतल्याचे मुलीच्या पालकांनी सांगितले.**

बिजलीनगर, चिंचवड परिसरात राहणाऱ्या एका विद्यार्थिनीला दहावीच्या परीक्षेकरिता निगडी येथील इंग्रजी माध्यमाच्या शाळेत केंद्र आले आहे. ती विद्यार्थिनी शनिवारी सकाळी परीक्षा देण्यासाठी शाळेत गेली. मात्र, तिने बुरखा घातला असल्याने शाळेने तिला वर्गात जाण्यासाठी मज्जाव केला. अखेर तिच्या पालकांनी पोलिस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधला,. निगडी पोलिसांनी मध्यस्थी केल्यावर तिला परीक्षेला बसू देण्यात आले.

> दहावीच्या पहिल्या पेपरपासून माझ्या मुलीला बुरखा घालून परीक्षेला बसण्यास मज्जाव केला जात आहे. बुरखा घालून परीक्षा देऊ नये, असा बोर्डाचा नियम नाही. आता मुलीला परीक्षेकरिता बसू दिले आहे. मात्र, सोमवारी तिला बुरखा घालून परीक्षेला बसू देणार नाही, असे शाळेने सांगितले आहे. माझी मुलगी सोमवारीही बुरखा घालून परीक्षेला जाणार आहे. जर शाळेने विरोध केलाच, तर आमच्या समाजातील बांधवांना बोलविणार आहे.
>
> **–विद्यार्थिनीचे पालक**

> दहावीच्या परीक्षेला कोणाला प्रवेश द्यायचा आणि कोणाला प्रवेश द्यायचा नाही, याचा अधिकार शिक्षणाधिकारी व संबंधित परीक्षा केंद्र प्रमुख यांना आहे. आम्हाला तो अधिकार नाही. त्यामुळे तेच विद्यार्थिनीच्या प्रवेशाबाबत निर्णय घेतील.
>
> **–शत्रुघ्न माळी,** वरिष्ठ पोलिस निरीक्षक, निगडी पोलिस ठाणे

> बुरखा घातला किंवा हिजाब घातला, तरी परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थिनीची ओळख पटविणे अनिवार्य आहे. त्यामुळे पेपर लिहिताना त्या मुलीचा चेहरा दिसणे गरजेचे आहे. महापालिकेच्या उर्दू शाळेतील मुलीही हिजाब घालून परीक्षेला जातात.
>
> **–संगीता बांगर,** शिक्षणाधिकारी, महापालिका





Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!